# वसई विरार शहर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दिनांक ०९/०२/२०१८

सभा सुचना क्र. २६    दु ११.३० वा.

| अु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.२५/०१/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा दि. २५/०१/२०१८ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडिक   सूचक :- मा.श्री. वैभव पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती जी कार्यालयाच्या आस्थापनेवरील एल.एस.जी.डी पदवीका परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त दोन वेतनवाढ देणेबाबत. | ठराव :- प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री. जिवन मनोहर वायवळ, लिपीक-टंकलेखक यांना त्यांच्या नियमित वेतनवाढीवर फरक न पडता त्यांना दोन अतिरीक्त वेतनवाढ मंजूर करणेस आजची सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस   सूचक :- मा.श्री. सखाराम महाडिक<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ३. | श्री दिलीप बाबुराव पाटील (वरिष्ठ लिपीक) व.वि.शम हयाचे वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती करण्याबाबत मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्री दिलीप बाबुराव पाटील, वरिष्ठ लिपीर, ह्यांनी तातडीच्या प्रसंगी पुणे प्रेव्हेनडिव्ह कार्डिक केअर, चिंचवड पुणे येथे दिनांक ०३/०७/२०१७ ते दि. १७/०७/२०१७ पर्यत उपचार करुन घेतलेले आहेत. तरी श्री. दिलीप बाबुराव पाटील ह्यांचे झालेल्या वैद्यकिय खर्चापोटी रक्कम रु. १,४४,८८८/- अक्षरी रु. एक लाख चवेचाळीस हजार आठशे अठ्याऐंशी मात्र) अदा करणेस आजची सभा वित्तीय व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.विद्या पाटील   सूचक :- मा.श्री. अजीत नाईक<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ४. | श्री. संजय भालचंद्र पाटील (लिपीक) वसई विरार शहर महानगरपालिका हयांच्या मुलीचे वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती करण्याबाबत मान्यता मिळणेबाबत | ठराव :- प्रस्तावाचा मजकूर पाहता श्री संजय भालचंद्र पाटील (लिपीक) ह्यांची मुलगी कुमारी डिनल संजय पाटील ह्यांना दि. ०२/१०/२०१७ ते दि. ०५/१०/२०१७ रोजी पी.डी. हिंदूजा हॉस्पीटल, माहिम येथे उपचार घेतल्याकामी झालेला खर्च रक्कम रु. १,६८,८८८/- मधून १०% कपात करून रक्कम रु. १,५१,९९९/- रु. असे मिळून रु. १,६३,९२४/- प्रतिपूर्ती करणेकामी ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस   सूचक :- मा.श्री. पंकज पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ५. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) मोरेगाव येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरुस्ती व नुतनीकरण करणे कामी | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. १७५ दि, २८/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करून सकारात्मकदृष्ट्या मे. बाबा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे |

| | | |
|---|---|---|
| | संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. किशोर पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ६. | प्रभाग समिती- एफ,धानिव/पेल्हार क्षेत्रातील पेल्हार मुख्य रस्ता ते धानिव स्मशानभुमी पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. संजय कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने ही प्राप्त निविदांमध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री.वैभव पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ७. | प्रभाग समिती- एफ, धानिव/पेल्हार क्षेत्रातील वॉर्ड क्र.४० येथे जि.प. शाळा ते केसर मेडीकल पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. अमित गांगण यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने ही प्राप्त निविदांमध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडिक सूचक :- मा.श्री.पंकज पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ८. | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) वॉर्ड क्र.२७ मधील मनवेलपाडा तलाव येथे विविध दुरुस्तीची कामे करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. १६३ दि, २८/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. तसेच मे. ओम साई कन्स्ट्रक्शन यांचे ४.९९% जादा हे प्राप्त झालेल्या निविदेतील दर महानगरपालिकेस मान्य वाटत असल्याने दर कमी करणेबाबत चर्चा करणेसाठी संबंधित ठेकेदारास दि. २१/१२/२०१७ च्या पत्रान्वये कळविले होते. तद्अनुषंगाने सदर काम अंदाजपत्रकीय दराने करणेस तयार असलेबाबत मे.ओम साई कन्स्ट्रक्शन यांनी दि. २२/१२/२०१७ च्या पत्रान्वये या कार्यालयास कळविलेनुसार सकारात्मकदृष्ट्या मे. ओम साई कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम दराची असल्याने महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करणेंस ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा.श्री.राजेंद्र कांबळी<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ९. | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान कार्यक्रमांतर्गत वसई विरार | ठराव :- सदर प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व असे ठरविण्यांत आले की, वन विभागाकडून वनक्षेत्रात काम करण्यासाठी प्राप्त झालेल्या परवानगीनंतर ठेकेदाराने युध्द पातळीवर कामे करुन दि. १ जूलै २०१७ पासून योजना चाचणी स्वरुपात कार्यान्वित केली |

| | | |
|---|---|---|
| | शहर महानगरपालिका वाढीव १०० द.ल.ली पाणी पुरवठा (सुर्या टप्पा ३) योजनेची कामे पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ देण्यात मंजूरी मिळणेबाबत. | व त्यानंतर पुढे पावसाळा सुरु झाल्याने विविध गुरुत्ववाहिन्या अंथरण्याचे काम, क्रॉस कनेक्शन व नालासोपारा रेल्वे क्रॉसिंगचे काम पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ मागितली असल्याने तसेच म.जी.प्रा.व पाणीपुरवठा विभागाने केलेल्या शिफारशीनुसार योजनेतील सर्व उपांगामधील सर्व बाबींचे भाववाढ निर्देशांक गोठवून दि. ३१/०३/२०१८ पर्यंत कामे पुर्ण करण्यासाठी ठेकेदारास अंतिम मुदतवाढ देण्यास व खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडिक सूचक :- मा.श्री. अजीत नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १०. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०५ नुसार प्रभाग समिती एच व आय आणि त्या अंतर्गत येणाऱ्या उपविभागीय कार्यालयांचा लेखापरिक्षण अहवालाबाबत दि. १२/०१/२०१८ रोजीचा स्थगित विषय मा. स्थायी समिती सभेपुढे सादर करणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच, नवघर-माणिकपूर व प्रभाग समिती आय,वसई व त्यांचे अंतर्गत येणाऱ्या उपविभागीय कार्यालयांचे दि. १ एप्रिल, २०१५ ते दि. ३१ मार्च, २०१६ या आर्थिक वर्षातील लेखापरिक्षण अहवालास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर ना. पाटील सूचक :- मा. श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०५ नुसार प्रभाग समिती ए व बी आणि त्या अंतर्गत येणाऱ्या उपविभागीय कार्यालयांचा लेखापरिक्षण अहवाल मा. स्थायी समिती सभेपुढे सादर करणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए, बोळींज व प्रभाग समिती बी, विरार पूर्व व त्यांचे अंतर्गत येणाऱ्या उपविभागीय कार्यालयांचे दि. १ एप्रिल, २०१५ ते दि. ३१ मार्च, २०१६ या आर्थिक वर्षातील लेखापरिक्षण अहवालास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडिक सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १२. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९९ नुसार सन २०१८-१९ या वर्षासाठी कर व दर निश्चित करणेबाबत. | ठराव :- प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा सभागृहात करणेंत आली. प्रस्तावातील बाब क्र. ८ मधील १००१ चौ.फुट अधिक कारखाने अनिवासी वापरासाठी या शिर्षकामध्ये १००१ ते १५०० व १५०१ ते २००० चौ.फुटा पर्यंत कारखाने अनिवासी वापरासाठी अशा दोन बाबी नव्याने समाविष्ट करण्यांत याव्यात. तसेच बाब क्र. ९ मधील १००१ चौ.फुट अधिक गोदामे अनिवासी वापरासाठी या शिर्षकामध्ये १००१ ते १५००, १५०१ ते २०००, २००१ ते ५००० चौ.फुट, ५००१ चौ.फुटाहून अधिक गोदामे अनिवासी वापरासाठी अशा चार बाबी नव्याने समाविष्ट करण्यांत याव्यात. तसेच बाब क्र. १० मधील ३००० ते ५००० चौ.फुट (प्रती शेड), ५००१ चौ.फुट (प्रती शेड) हून अधिक तबेले अनिवासी वापरासाठी अशा दोन बाबी नव्याने समाविष्ट करण्यांत याव्यात. या नव्याने समाविष्ट झालेल्या अतिरीक्त बाबींचे दर मा.सभेने ठरवावेत अशी शिफारस असून मा.स्थायी समिती सभा दि. ०९/०२/२०१८ नुसार, सन २०१७-१८ सालासाठी लागू असलेले कर-दर सन २०१८-१९ साठी लागू ठेवावेत अशी शिफारस करीत आहे. तसेच अग्नीशमन शुल्काबाबत मा. शासनाने शिफारस केलेले दर मान्य केले आहेत. तथापि, मा.महासभेने कर-दराबाबत सर्वकष विचार विनिमय करुन अंतिम निर्णय घ्यावा अशी आजची स्थायी समिती शिफारस करीत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १३. | वसई विरार शहर महानगरपालिका सुर्या टप्पा १ व २ अंतर्गत १०० द.ल.ली पाणी पुरवठा योजनेअंतर्गत धुकटन जलशुध्दीकरण केंद्राच्या आवारातील डांबरी रस्त्याची दुरुस्ती करणे तसेच रस्त्यालगत पाणी निचरा करणेसाठी गटार (Strom Water) ची दुरुस्ती करणे. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमूद कामाच्या अंदाजपत्रकीय रु. ३८,०७,५५९.०० रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे व पुढील निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. किशोर नाना पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १४. | वसई विरार शहर महानगरपालिकेतील विश्रांतीगृहासाठी काळजी वाहक- नि-खानसामा (Care Taker Cum Khansama) या पदावरील नियुक्त केलेल्या कर्मचा-यास मुदतवाढ देणे बाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील श्री. दिलीप वसंल पाटील, काळजी वाहक-नि-खानसामा हे लिपीक पदापेक्षा खालचे पद असून त्या पदाचे वेतन घेत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३ (३) अन्वये त्यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून तात्पुरत्या स्वरुपात दि. ०२/०२/२०१८ पासून पुढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याबाबतच्या प्रस्तावास आजची ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. सखाराम महाडिक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १५. | अग्निशमन विभागातील वाहने निर्लेखित करुन लिलावाद्वारे विक्री करणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्नीशमन विभागातील दोन वाहने वॉटर टेंडर वाहन क्र. MH०४ H-८०३२ व वाहन क्र. MCY-३०१५ ही वाहने दुरुस्ती करण्यापलिकडे गेलेली असून शासनाच्या धोरणानुसार वाहनांचा वापर १० वर्ष कालावधीपेक्षा जास्त झाली असल्याने मा.उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांचेकडील वाहनांचे मूल्यांकन अहवालानुसार तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता१९७१ अन्वये भाग -फ ४० (१) नुसार ई-निविदा प्रक्रिया करुन सदर वाहने निर्लेखित करणेंत ही सभा मंजूरी देत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री.महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका